cmyk

दैनिक महाराष्ट्र www.esuryodaylive.in Email :daily.suryoday@gmail.com

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे

दैनिक महाराष्ट्र सूर्योदय

अंक बीड शहरात घरपोहच मिळवण्यासाठी संपर्क करा

संपर्क

मो. नं.७०२०८३७८५४, ७०२०२७२७६२



बीड || वर्ष १० वे|| अंक २९३ || गुरूवार, दि.२२ ऑगस्ट २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

# महाराष्ट्रातील पीक विम्याचे संपूर्ण पैसे अदा करु-केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान








## महाराष्ट्राच्या कृषी महोत्सवाचे चौहान यांच्याकडून कौतुक

**बीड, दि. २१ : लाडकी बहीण व लाडका भाऊ नंतर आता आपला अन्नदाता असणाऱ्या शेतकऱ्याच्या लाभाच्या सर्व योजना राबवून लाडका शेतकरी अभियान राज्यात सुरु करण्यासोबतच सोयाबीन व कापसाला हेक्टरी पाच हजार रुपये मदत देण्यातील ई पिक पाहणीची अट रद्द करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज परळी वैजनाथ येथील राज्यस्तरीय कृषि महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी केली.**

परळी येथील स्व. पंडीतअण्णा मुंडे सभामंडप कृषि उत्पन्न बाजार समिती येथे एका दिमाखदार सोहळ्यात पाच दिवसीय कृषि महोत्सव २०२४ चे उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास केंद्रीय कृषि व शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमास व्यासपीठावर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार, राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे, राज्य कृषि मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल तसेच विधानपरिषद सदस्या आमदार पंकजा मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते रिमोटद्वारे नमो शेतकरी महासन्मान योजनेचा चौथा हप्ता राज्यातील शेतकऱ्यांच्या खात्यात डीबीटीद्वारे जमा करण्यात आला. तसेच सोयाबीन, कापूस उत्पादक शेतकऱ्यांना पाच हजार रुपये अनुदान वितरीत करण्यासाठी वेबपोर्टलही मान्यवरांच्या हस्ते कार्यान्वित करण्यात आले. कृषि विभागाच्या विविध योजनांच्या माहितीचा समावेश असलेल्या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन करण्यात आले. यासोबतच परभणी येथील वसंतराव नाईक कृषि विद्यापीठाने तयार केलेल्या एकात्मिक कीड रोग व्यवस्थापन पुस्तिकेचेही यावेळी प्रकाशन करण्यात आले.

पाच दिवसीय चालणाऱ्या या कृषि महोत्सवात कृषि साहित्य प्रदर्शनासोबतच पशुप्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत येणाऱ्या पाच दिवसात विविध विषयांवर परिसंवाद, चर्चासत्र होणार आहे. तसेच याठिकाणी धान्य महोत्सव, रानभाजी महोत्सव होणार आहे. प्रदर्शनात महिला बचतगटांसाठी साहित्य विक्रीची दालने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. कृषि अवजारांचा स्वतंत्र विभाग देखील याठिकाणी आहे. या पाच दिवसीय महोत्सवाला किमान पाच लाख शेतकरी भेट देण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

राज्यातील सरकार हे शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देणारे असून आतापर्यंत नैसर्गिक आपत्तीच्या काळात हे सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले आहे. एनडीआरएफचे निकष बाजूला ठेवून दुप्पट नुकसानभरपाई देण्याचा निर्णय शासनाने घेतला. गतवर्षी सोयाबीन, पान २ वर

- सरकारला बहीण, भाऊ आणि शेतकरी सुद्धा लाडका, हे आम्ही कामातून सिद्ध केलं - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे
- नॅनो खतांच्या वापरासाठी राज्याला पाठबळ देणार - चौहान यांची घोषणा
- २०२३च्या सोयाबीन-कापूस अनुदानासाठी ई-पीक पाहणीची अट रद्द - धनंजय मुंडेंची मागणी अन मुख्यमंत्र्यांची घोषणा
- शेतकऱ्यांना मोफत व दिवसा वीज देणार, महाराष्ट्र जलसंपन्न बनवण्यासाठी कटिबद्ध - देवेंद्र फडणवीस
- धनंजय मुंडे जी जबाबदारी दिली ती चोखपणे पार पाडतात - अजितदादांकडून मुंडेंचे कौतूक
- भाई, भाऊ अन दादांचे महायुती सरकार शेतकरी - कष्टकऱ्यांना न्याय देणारे - धनंजय मुंडे
- परळीत दिमाखदार सोहळ्यात राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचे उद्घाटन
- नमो शेतकरी महासन्मान योजनेच्या चौथ्या हफत्याचे वितरण; ९१ लाख शेतकऱ्यांच्या खात्यांवर प्रत्येकी दोन हजार रुपये जमा
- सोयाबीन-कापूस अनुदान वितरणाच्या पोर्टलचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण
- छत्रपती शिवाजी महाराजांना वंदन करून कार्यक्रमाची सुरुवात
- शिवाजी महाराज चौक ते कार्यक्रम स्थळ भव्यदिव्य रॅली द्वारे बीड जिल्हा वासीयांनी केले मान्यवरांचे स्वागत
- देशातला सर्वात देखणा कृषी महोत्सव परळीत - सर्वच नेत्यांकडून आयोजनाचे कौतुक
- मराठवाड्याची व वारकरी संप्रदायाची ओळख असलेला पालखुर फेटा बांधून मान्यवरांचे स्वागत
- शेतकरी व महिला यांच्या वतीने खास स्वागत
- शिवराजसिंह चौहान यांनी जाग्या केल्या स्व.गोपीनाथराव मुंडेंच्या आठवणी, माझे मोठे भाऊ व मार्गदर्शक होते - चौहान
- अजितदादांनी जागवल्या स्व.मुंडे व स्व.पंडित अण्णांच्या आठवणी; पंडित अण्णा प्रगतशील शेतकरी होते - अजितदादा



बीड : परळी येथे कृषी महोत्सवानिमित्त आलेले राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, आमदार प्रकाश सोळंके, जिल्हाध्यक्ष ड. राजेश्वर चव्हाण यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.




## आमदार प्रकाश सोळंके यांच्या वायफळ बडबडीचा माजलगाव पत्रकारांनी व्यक्त केला निषेध

माजलगाव प्रतिनिधी शेख हमीद

माजलगाव मतदार संघाचे विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांनी वृत्तपत्राच्या बाबत तथ्यहीन वृत्त छापणारे पेपर असा केल्यामुळे संपूर्ण वृत्तपत्राच्या माजलगाव येथील पत्रकारांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक ते छत्रपती संभाजी महाराज चौका पर्यंत निषेध रॅली काढून जाहीर निषेध व्यक्त केला

आ. प्रकाश सोळंके यांनी राजकारणातून निवृत्ती घेऊन जयसिंह सोळंके यांना वारसदार म्हणून घोषित केले माजलगाव मतदार संघाच्या जनतेसाठी नवख असणार नेतृत्व जयसिंग सोळंके यांच्यासाठी पान २ वर

## एक लाखाची लाच घेताना मडळ अधिकारी पकडला!

बीड दि.२० : अवैधरित्या केलेले उत्खनन कमी दाखवण्यासाठी मंडळ अधिकारी सचिन सानप याने दोन लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. कार्यारंभ तडजोडअंती दीड लाख रुपयांची लाच स्विकारण्याचे मान्य केले. यातील पहिला हप्ता म्हणून एक लाख रुपयांची लाच घेताना बुधवारी (दि.२१) दुपारी बीड एसीबीने रंगेहाथ पकडले.

ही कारवाई बीड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड शहरातील तहसील कार्यालयाजवळील एका हॉटेलात करण्यात आली. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या कारवाईने महसूल क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

### बीडमधील कारवाई महसूल विभागात खळबळ

**सचिन सानप याने दोन लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली होती.**



## लिंबागणेश महसूल मंडळात अतिवृष्टीमुळे नुकसान; पंचनामे करुन नुकसान भरपाईची मागणी ; महसूल प्रशासन म्हणते वरुन पंचनाम्याचे आदेश नाही तर कृषी विभाग कृषी महोत्सवात व्यस्त- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:- (दि.२१) बीड तालुक्यातील सात महसुली मंडळात अतिवृष्टी झाली असुन लिंबागणेश महसूल मंडळात ९५.३ मि.मि.पाऊस झाल्याची शासन दरबारी नोंद झाली आहे. बीड तालुक्यात १ जुन पासुन समाधानकारक पाऊस असतानाच दोन दिवसांपूर्वी झालेल्या पावसाने शेतातील मका , सोयाबीन आदी पिके पाण्याखाली गेली आहेत तर काही ठिकाणी भुईसपाट झाली आहेत. अस्मानी संकटामुळे हातातोंडाशी आलेला घास हिरावला असुन शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यामुळे महसूल प्रशासनाने तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी महसूल प्रशासन व कृषीविभागाला केली आहे.

हातातोंडाशी पान २ वर



cmyk

# संपादकीय

## पिंजऱ्यातले पिंजऱ्यात

बँकांतील घटत्या रकमांची चिंता सरकारला वाटू लागली असेल तर पाणी दिसते त्यापेक्षा अधिक ठिकाणी मुरते आहे, हे लक्षात घ्यावे लागेल

अर्थमंत्री निर्मला सीतारामन, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास आदी मान्यवर गेले काही महिने एकच एक मुद्दा सातत्याने मांडताना दिसतात. तो म्हणजे बँकांतील घसरत्या ठेवींचा. आपल्याकडे बँकांत ठेवी ठेवणाऱ्यांचे प्रमाण सातत्याने घसरू लागले असून आहेत त्या ठेवींदारांतील निम्मे ठेवीदार हे वृद्ध गटातील आहेत. याचा अर्थ असा की कमावत्या वयातील तरुणांना आपल्या बँकांतील ठेवी तितक्या आकर्षक वाटेनाशा झाल्या आहेत. तरुण वयातील आकर्षणे वेगळी. ती बदलण्याचा वेगही वेगळा. ते योग्यच. कारण तरुणही वृद्धांप्रमाणेच वर्तन करू लागले तर 'जीर्ण शाल मग उरे शेवटी' हे 'लेणे तारुण्याचे' व्हायचे. मग सगळीच पंचाईत. तेव्हा तरुणांना बँकांतील ठेवी आकर्षक वाटत नसतील तर त्यांची निरिच्छा काही प्रमाणात निश्चित समजून घेता येईल. तथापि बँकांकडे पाठ फिरवण्याची तरुणांची वाढती सवय आणि त्याचवेळी बँकांकडून उचल/कर्ज घेण्याचे वाढते प्रमाण यामुळे एक विचित्र पेच भारतीय बँकांसमोर उभा ठाकलेला दिसतो. बँकांत पैसा येण्याचे घटते प्रमाण आणि त्याचवेळी कर्ज मागण्यास येणाऱ्यांचा वेग कायम असणे यातून पैशाचे बँकांतील आवक आणि जावक यातील संतुलन बिघडू लागले आहे. ही चिंतेची बाब. कारण बँकांत पैसा येणेच कमी झाले की बँका पैसा देणार कोठून? कोणीतरी ठेवी ठेवते म्हणून कोणाला तरी बँकांतून कर्ज मिळते. यात दोन-तीन टक्क्यांचा फरक असणे नैसर्गिक. पण सद्या:स्थितीत तो सहा टक्क्यांवर गेला असून त्यामुळे अर्थमंत्रालय आणि रिझर्व्ह बँक यांच्यात धोक्याची घंटा घणघणू लागली आहे. या धोक्याचे इशारे अर्थमंत्री आणि गव्हर्नर गेले काही महिने देत होते. अखेर या मुद्द्यावर अर्थमंत्र्यांनी सर्व बँक प्रमुखांशी सोमवारी चर्चा केली. आता या ठेवी कशा वाढवता येतील यासाठी प्रयत्न सुरू होतील. तेव्हा जनसामान्यांसाठी अत्यंत जिव्हाळ्याचा असलेला हा विषय लक्षात घ्यायला हवा.

गेल्या, म्हणजे जुलै २०२४, महिन्याच्या अखेरीस आपल्या समस्त बँकांतील ठेवी २११.९३ ट्रिलियन रु. (२११.९३ लाख कोटी रु. ) इतक्या आहेत तर दिल्या गेलेल्या कर्जांची रक्कम आहे १६८.१४ लाख कोटी रु. इतकी. यावरून अजूनही पन्नासएक लाख कोटी रुपयांची कर्जे देता येतील इतकी बक्कळ रक्कम बँकांत पडून आहे, असे म्हणता येईल. म्हणजे लगेच खणखणाटास सामारे जावे लागेल, असे नाही. तथापि समस्या वर्तमानाची नाही. ती भविष्याची आहे. याचे कारण गेल्या वर्षभरात ठेवींचा दर हा कर्जाच्या दराच्या तुलनेत मागे मागे पडू लागला आहे. या वर्षात ठेवी वाढीचा वेग १०.६ टक्के इतका होता. तर कर्जे वाढीचा वेग आधी १३.७ टक्के आणि नंतर १६ टक्क्यांवर गेला. व्यक्तीस ज्याप्रमाणे उत्पन्नाच्या तुलनेत खर्च करणे वा हातउसन्या रकमा देणे अवघड असते त्याचप्रमाणे बँकांसाठीही हे संतुलन सांभाळणे आव्हान असते. त्यास 'कर्ज-पत गुणोत्तर' (क्रेडिट-डिपॉझिट रेश्यो) असे म्हणतात. बँका उगाच सढळ हस्ते कर्जे वाटत सुटू नये म्हणून त्यांना मिळणाऱ्या ठेवींतील विशिष्ट रक्कम सरकार दरबारी सुरक्षित ठेवीसाठी काढून द्यावी लागते. म्हणजे प्रत्येक १०० रुपयांच्या ठेवीतील ४.५ रु. रिझर्व्ह बँकेत रोख आणि १८ रु. सरकारी रोखे यात गुंतवणे बँकांवर बंधनकारक आहे. म्हणजेच प्रत्येक १०० रुपयांतील जेमतेम ७८.५ इतकीच रक्कम प्रत्यक्ष कर्जापोटी देण्यासाठी बँकांहाती राहते. तेव्हा बँकांतील ठेवींच्या घटत्या प्रमाणाची सरकारला इतकी चिंता का याचे उत्तर यावरून मिळेल. आता याबाबतच्या कारणांविषयी. यातील कळीचा प्रश्न म्हणजे बँकांतील ठेवींचे प्रमाण घसरण्याचे कारण काय?

व्याजाचे दर हे यातील एक. सध्या बँकांतील निधींवर मिळणारा परतावा हा चलनवाढीशी जेमतेम बरोबरी साधू शकेल - न शकेल, इतका नगण्य आहे. बचत खात्यातील रकमेची तीन-साडेतीन टक्क्यांवर बोळवण होते तर ठेवींवर दोन-तीन टक्के अधिक मिळतात. भरगच्च रक्कम आणि दीर्घ कालावधी आणि परत ज्येष्ठ नागरिक असले तर एखाद्या अधिक टक्क्याची खिरापत. असे असताना ज्याची नजर भविष्याकडे आहे अशी कोणती शहाणी व्यक्ती बँकांच्या नादी लागेल? त्याचवेळी 'सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लान' (एसआयपी) सारख्या माध्यमातून अधिक किमान रकमांच्या आधारे चमचमीत परतावा देणाऱ्या अनेक गुंतवणूक योजना अनेक वित्तसंस्था घेऊन येत असतील तर अधिकाधिकांचे दिल कोणाकडे खेचले जाईल, हे सांगण्यास अर्थतज्ज्ञाची गरज नाही. बरे, या नव्या नटव्या योजनांस नावे ठेवण्याचीही सोय नाही. कारण त्यांच्या आधारे आपल्या गुंतवणुकीवर २०-२५ टक्के परतावा मिळवणाऱ्या इतक्या यशोगाथा इतक्या मध्यमवर्गीय कुटुंबांत अलीकडे वाढू लागलेल्या आहेत की त्यांच्या समोर बँकांच्या ठेवींचा आसरा शोधणारे 'नामर्द' ठरावेत. या अशाच 'एसआयपी' योजना भांडवली बाजाराबाबतही सुरू झालेल्या आहेत. आपणास जमेल तितक्या रकमेच्या आधारे सुरुवात करायची आणि आपली गुंतवणूक-वेल बहरताना पाहायची! हे हल्ली अनेक जण करतात. परत बँकांच्या तुलनेत भांडवली बाजाराच्या वेली वाढत्या ठेवण्यात सरकारलाही रस असल्याने बाजार उठणार नाही याची काळजी अगदी सर्वोच्च पातळीवर घेतली जाते.

हे टाळण्यासाठी बँकांतील ठेवींवर व्याजदर आणखी आकर्षक करू जावे तर चलनवाढीचा धोका. आपली मानसिकता अशी की ठेवींवर जमेल तितके अधिक व्याज हवे आणि त्याचवेळी कर्जे मात्र जमेल तितकी स्वस्तात हवीत. हे असे होत नाही. ठेवींवरील व्याजदर कमी असल्याखेरीज पतपुरवठा स्वस्तात करता येणे अवघड. हे वास्तव. ते काही नव्याने समोर येत आहे असे नाही. पण तरीही बँकांतील घटत्या रकमांची चिंता सरकारला वाटू लागली असेल तर पाणी दिसते त्यापेक्षा अधिक ठिकाणी मुरते आहे, हे लक्षात घ्यावे लागेल. म्हणूनच विविध खासगी तसेच सरकारी बँकांच्या प्रमुखांनी आपापल्या बँकांत ठेवी ठेवणे अधिकाधिक आकर्षक कसे होईल याचे प्रयत्न सुरू केल्याचे दिसते. अधिक व्याज, ज्येष्ठ नागरिकांस विशेष सोयी, ठरावीक रकमेच्या वरील ठेवींवर जास्त व्याज इत्यादी उपाय विविध बँका जाहीर करू लागल्या आहेत. पण हे किती बँकांस किती प्रमाणात करता येणार यास मर्यादा आहेत. बुडीत खात्यात गेलेली कर्जे आणि निव्वळ नफा या त्या मर्यादा. अनेक बँकांनी आपले ताळेबंद स्वच्छ आणि डागरहित आहेत हे दखवण्यासाठी बुडीत खात्यातील कर्जे पुसून टाकली. हे एखाद्या चलाख विद्यार्थ्याने अनुत्तीर्णतेचा लाल शेरा टाळण्यासाठी तो विषयच प्रगतिपुस्तकावर येणार नाही, अशी 'व्यवस्था' करण्यासारखे. तशी अधिकृत सोय बँकांना असल्याने अनेकांनी हा उद्योग केला. परिणामी 'दिसणाऱ्या' बुडत्या कर्जांच्या रकमा गायब झाल्या. त्यातून बँकांना हात झटकण्याची सोय झाली असेल. पण त्यामुळे बँकांच्या किफायतशीरतेवर त्याचा परिणाम झाला.

त्यात जर नफाही आटू लागला असेल तर पुराचे पाणी धोक्याच्या इशाऱ्यास स्पर्श करू लागल्याचे मानणे इष्ट. तेव्हा अर्थमंत्र्यांची या विषयावरील वाढती लगबग रास्त ठरते. ती फलदायी ठरणे महत्त्वाचे. बँकेत रोख हाताळणारे कर्मचारी मोठ्या टेचात पिंजऱ्यात बसून जणू आपल्या खिशातलीच रक्कम समोरच्या ग्राहकास देत असल्यासारखे वागत असतात. आता समस्त बँकांवरच पिंजऱ्यात जाण्याची वेळ आली आहे. या पिंजऱ्यातून ते कशी सुटका करून घेतात ते पाहायचे.

# तिसऱ्या श्रावणी सोमवारी बाजीराव चव्हाण यांच्या पुढाकाराने बीड जिल्ह्यात

### भव्य महाआरोग्य शिबिरांचे आयोजन; हजारो भाविकांनी घेतला लाभ




बीड - दिनांक १९ ऑगस्ट २०२४ रोजी तिसऱ्या श्रावणी सोमवारी, बीड जिल्ह्यात विविध ठिकाणी भव्य महाआरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. रुग्ण सेवा हीच खरी ईश्वर सेवा हे ध्येय निस्वार्थपणे मनात बाळगून, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अत्यंत विश्वासू आणि जवळचे मानले जाणारे आरोग्यदूत बाजीराव चव्हाण यांनी हे शिबिर आयोजित केले.

या शिबिरांचे आयोजन गोरक्षनाथ टेकडी,(मोरगाव, नागनाथ मंदिर), चाकरवाडी (संत ज्ञानेश्वर माऊली महाराज मंदिर), पाली (नागनाथ मंदिर), बेलगाव (बेलेश्वर देवस्थान), कपिलधार (मनमत स्वामी मंदिर), वांगी (निर्मलनाथ मंदिर) अशा पवित्र स्थळांवर करण्यात आले होते. तिसरा श्रावणी सोमवार असल्यामुळे या देवस्थानांवर पंचक्रोशीतून लाखो भाविक भक्त दर्शनासाठी आले होते.

शिबिरांचे प्रमुख उद्दिष्ट भाविक भक्तांचे आरोग्य सुरक्षित ठेवणे आणि गरजू रुग्णांना तत्काळ मदत पुरवणे होते. बाजीराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील या महाआरोग्य शिबिरात विविध प्रकारच्या आरोग्य तपासण्या करण्यात आल्या, या शिबिरांत रक्तदानाचाही कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये अनेक भाविकांनी उत्साहाने भाग घेतला. शिबिरांमध्ये सुमारे सहा ते सात हजार लोकांनी सहभाग घेतला आणि आरोग्य तपासणी व उपचारांचा लाभ घेतला. या शिबिरांमुळे भाविक भक्तांच्या आरोग्याच्या गरजा त्वरित पूर्ण झाल्या, तसेच गरजू रुग्णांना प्रभावी उपचार मिळाले.

# प्रीतिसंगमावरून यात्रेस लाभली नवीन ऊर्जा!



कऱ्हाड, दि. १७ (प्रतिनिधी) : प्रीतिसंगम येथून नवीन ऊर्जा घेऊन पत्रकार संवाद यात्रेची वाटचाल अधिक जोमाने चालू राहील, असे भावोद्गार महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे ह्यांनी काल काढले.

नागपूरच्या दीक्षाभूमीवरून मुंबईतील मंत्रालयाकडे निघालेली पत्रकार संवाद यात्रा शुक्रवारी (दि. १६) दुपारी येथे पोहोचली. स्थानिक पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी ही भावना व्यक्त केली. संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, जिल्हाध्यक्ष प्रवीण कांबळे, आरोग्य सेलचे अध्यक्ष डॉ. अमित खाडे, माजी आमदार आनंदराव पाटील, पंचायत समितीचे सदस्य रमेश लवटे, भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सरचिटणीस भरतनाना पाटील ह्या वेळी उपस्थित होते.

संवाद यात्रेचे आगमन झाल्यावर श्री. मुंडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजीमहाराज ह्यांच्या पुतळ्यास आणि आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व माजी पंतप्रधान यशवंतराव चव्हाण ह्यांच्या समाधिस्थळास मनोभावे अभिवादन केले. ते म्हणाले की, कऱ्हाड म्हणजे शूर वीरांची भूमी. कृष्णा व कोयना नद्यांच्या संगमावरून एक नवी ऊर्जा मिळाली.

पत्रकार संवाद यात्रेचे उद्दिष्ट सांगताना श्री. मुंडे म्हणाले, ''कोरोना आणि लॉकडाऊन ही संकटे वृत्तपत्र व्यवसायाला ओहोटी लागण्यास कारणीभूत ठरली. खप कमी झाला, अनेक वृत्तपत्रांच्या आवृत्त्या बंद झाल्या. त्यामुळे पत्रकारांच्या नोकऱ्यांवर गदा आली. कोरोना काळात १५० पत्रकारांचा मृत्यू झाला. आर्थिक अडचणीमुळे अनेकांनी आत्महत्या केल्या. निवृत्त पत्रकारांना सन्माननिधीचा लाभ वेळेत मिळत नाही.''

चोहो बाजूंनी अशी कोंडी झाल्यामुळे पत्रकारांच्या प्रश्नांना वाचा फोडणार कोण? अशा परिस्थितीत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ पुढे आला, असे सांगून श्री. मुंडे म्हणाले की, संघटनेच्या माध्यमातून अनेक प्रश्नांना वाचा फुटली. अनेक पत्रकार व्यक्त होऊ लागले आणि आमचे म्हणणे सरकारपर्यंत काही प्रमाणात पोहोचले.

संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे म्हणाले की, संवाद यात्रेचा समारोप येत्या मंगळवारी (दि. २० ऑगस्ट) मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे होईल. त्यास महाराष्ट्रातील बहुसंख्य पत्रकार उपस्थित राहणार आहेत. त्या संघटित शक्तीच्या माध्यमातून राज्य सरकारसमोर आपल्या व्यथा मांडू.

पान १ वरुन

## लिंबागणेश महसूल मंडळात

आलेला घास हिरावला; पिके भुईसपाट; पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी:- अनिल ढवळे, जनार्दन वाणी, विनायक मोरे

मका पिकांवर उगवल्यापासुनच लष्करी अळीने हल्ला चढवला होता, थेट मक्याच्या भुट्यांमध्येही अळीने पन्नास टक्के दाणे खाऊन टाकले होते मोठ्या प्रमाणावर औषध पाण्याचा खर्च करून जे शेतात तग धरून होते. २ दिवसांच्या पावसाने आडवे होऊन भुईसपाट झाले आहे.शेतात मक्याचे कणसं मातीत लोळत असुन हातातोंडाशी आलेला घास अतिवृष्टीमुळे हिरावला असुन सरकारने पंचनामे करून आम्हाला मदत करावी अशी मागणी लिंबागणेश येथील नुकसान ग्रस्त शेतकरी आनिल ढवळे, जनार्दन वाणी,विनायक मोरे यांनी केली आहे.

आम्ही अडाणी,ई पिक पाहणी आम्हाला नाही कळत:- अनिल ढवळे ( शेतकरी)

मका पिकांमध्ये गुडघाभर पाणी साचले असुन मुळाशी पाणी लागल्याने पिक वायाच जाणार आहे. मी अडाणी माझ्याकडे साधा मोबाईल आहे आणि ई पिक पाहणी म्हणतेत ते काही आम्हाला जमत नाही अशी व्यथा आनिल ढवळे यांनी बोलाऊन दाखवली.

महसूल विभागाचे कर्मचारी म्हणतात पंचनाम्याचे आदेश नाहीत तर कृषी विभाग कर्मचारी कृषी महोत्सवात व्यस्त:- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश महसूल मंडळातील अतिवृष्टीमुळे नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यात यावी यासाठी महसूल प्रशासनाला संपर्क साधला असता तलाठी पोतदार यांनी आम्हाला अजुन पंचनामे करण्याचे वरून आदेश आले नाहीत म्हटले तर मंडळ अधिकारी अशोक डरपे यांनी स्थानिक पातळीवरील तलाठी, ग्रामसेवक,कृषी सहाय्यक यांची गावपातळीवरील कमिटी पंचनामे करेल असे सांगितले तर कृषी विभागातील अधिकारी ,कर्मचारी आजपासून ५ दिवस परळी येथे राज्यस्तरीय कृषी महोत्सवात व्यस्त असल्याचे सांगितले त्यामुळे महसूल आणि कृषी विभागाच्या संयुक्त पथकाने करण्यात येणाऱ्या नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे कधी होणार आणि मदत कधी मिळणार हा सुद्धा एक प्रश्नच आहे.

## महाराष्ट्रातील पीक विम्याचे संपूर्ण

कापूस पिकाला कमी दर मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादित प्रति हेक्टरी पाच हजार रुपये देण्याचा निर्णय शासनाने घेतला. यासाठी आवश्यक ई-पीक पाहणी अहवाल अनेक शेतकऱ्यांकडे उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले असल्याने आता ई-पीक पाहणी अहवालाची अट शिथिल करून सातबारा उताऱ्यावरील नोंदीनुसार अनुदान वाटप करण्यात येईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. यासोबतच लाडक्या भावांना विद्यावेतन देण्यासाठी शासनाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना आणली. आता याच धर्तीवर विविध लाभांच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी लाडका शेतकरी अभियान सुरु करण्याची घोषणा मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केली. याची सुरुवात आज नमो शेतकरी महासन्मान योजनेचा दोन हजार रुपयांचा चौथा हप्ता शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करून होत असल्याचे त्यांनी सांगीतले. शेतकऱ्यांना केवळ १ रुपया विमा हप्ता भरून प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा लाभ देणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य असून साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषिपंपांना मोफत वीज देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. 'कष्टकरी, वारकरी आणि सुखी शेतकरी' हेच शासनाचे धोरण असून राज्यातील कांदा, सोयाबीन, कापूस आणि दुधाला

पान १ वरुन

योग्य मिळवून देण्यासाठी केंद्र आणि राज्य शासन प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. माझी लाडकी बहीण योजनेमुळे महिलांच्या सक्षमीकरणामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळणार असून ही योजना कायमस्वरूपी सुरु राहणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. तसेच कृषि क्षेत्रातील नवीन बदलांची माहिती शेतकऱ्यांना मिळण्यासाठी, आधुनिक शेतीला चालना मिळून राज्यातील कृषि क्षेत्राचा विकास होण्यासाठी कृषि महोत्सव उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारी आणि त्यांना सन्मान मिळवून देणारी असल्याचे नमूद करून ही योजना सुरु केल्याबद्दल केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी राज्य शासनाचे अभिनंदन केले. राज्यातील शेतकऱ्यांना केंद्रात न्याय मिळवून दिला जाईल, असे सांगून ते म्हणाले की, केवळ १ रुपयात प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ देणारे आणि प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या धर्तीवर नमो शेतकरी महासन्मान योजना राबवून शेतकऱ्यांना दरवर्षी सहा हजार रुपये देणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी प्रयत्नशील आहे. महाराष्ट्रातील सोयाबीन, कापूस आणि कांदा उत्पादक शेतकऱ्यांना शेतमालाचा योग्य दर मिळवून देण्यासाठी केंद्र व राज्य शासन सकारात्मक निर्णय घेईल, असे कृषिमंत्री श्री. चौहान म्हणाले. मराठवाड्यातील दुष्काळ दूर करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. समुद्रात वाहून जाणारे ५० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतची योजना अंतिम टप्प्यात असून बीड जिल्ह्यातील आष्टीपर्यंत लवकरच हे पाणी येईल. यासाठी मराठवाड्याचे हक्काचे पाणी मराठवाड्यात आणण्यासाठी सुमारे ११ हजार कोटींची कृष्णा-भीमा स्थिरीकरण योजना हाती घेण्यात आली आहे. ११ सिंचन प्रकल्पांसाठी १३ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तसेच नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पातून शेतकऱ्यांना विविध बाबींचा लाभ देण्यासाठी ६ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. तसेच जायकवाडी प्रकल्पाच्या टप्पा-२ साठी ५३६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून माजलगाव कालव्याचे काम हाती घेण्यात आले आहे. यामुळे मराठवाड्यातील ८५ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. त्यामुळे मराठवाड्याचा सिंचनाचा अनुशेष दूर होवून शेतकऱ्यांना सिंचनाची सुविधा उपलब्ध होईल, असे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महिलांच्या सक्षमीकरणासाठी गती देणारी ठरेल असे त्यांनी सांगितले.

सर्वसामान्य गरीब नागरिक हा केंद्रबिंदू मानून राज्य शासन विविध योजनाची प्रभावी अंमलबजावणी करीत आहे. त्यानुसार राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून जवळपास सव्वाकोटी माता-माउलींच्या खात्यात योजनेची रक्कम जमा करण्यात आली आहे. तसेच गरीब कुटुंबातील मुलींना मोफत व्यावसायिक शिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेतून महिलांना दरवर्षी तीन मोफत गॅस सिलेंडर मोफत देण्यात येणार आहेत. त्यामुळे ५२ लाख कुटुंबांना लाभ होणार आहे. सुमारे ४४ लाख शेतकऱ्यांना मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजनेचा लाभ मिळणार असून शेतकऱ्यांना साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषिपंपांना मोफत वीज मिळेल, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. तसेच अवर्षणप्रवण भाग असलेल्या मराठवाड्यातील शेतकऱ्यांना पाच दिवसीय राज्यस्तरीय कृषि महोत्सवात शेतीतील नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळणार असून त्यांचे

पान १ वरुन

उत्पन्न वाढीसाठी हा महोत्सव उपयुक्त ठरेल, असे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांना कृषि क्षेत्रात होत असलेल्या क्रांतीची, नवीन बदलांची माहिती मिळावी, यासाठी कृषि विभागाने राज्यस्तरीय कृषि महोत्सवाचे आयोजन केले आहे. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च करून त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार केला जात आहे. ड्रोनद्वारे फवारणी, नॅनो युरिया, नॅनो डीएपी वापराबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती केली जात आहे. यामुळे भविष्यात शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्च जवळपास ३० टक्केने कमी होवून उत्पन्नात २० टक्के वाढ होईल, असा विश्वास राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केला.

विधानपरिषद सदस्य पंकजा मुंडे यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविकामध्ये कृषि आयुक्त रवींद्र बिनवडे यांनी राज्यस्तरीय कृषि महोत्सवाबाबत माहिती दिली. पाच दिवसीय कृषि महोत्सवात शेतकऱ्यांना नवनवीन प्रयोगांची माहिती देण्यासाठी चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले असून ४०० पेक्षा अधिक दालनांतून शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञान, प्रयोगांची माहिती दिली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रारंभी महिला आणि शेतकऱ्यांच्यावतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मान्यवरांचा एकत्रित हार घालून सत्कार करण्यात आला. तसेच बैलबंडी भेट देण्यात आली.

या कार्यक्रमास व्यासपीठावर आमदार विक्रम काळे, आमदार प्रकाश सोळंके, आमदार नमिता मुंदडा, आमदार बाळासाहेब आजबे, माजी आमदार टी.आर. जिजा पाटील, माजी आमदार सुरेश धस, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संगीतादेवी पाटील यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन क्षिप्रा मानकर यांनी केले, आत्माचे प्रकल्प संचालक सुभाष साळवे यांनी आभार मानले.

हेलिपॅडवर स्वागत

क ार्यक्रमासाठी प्रमुख अतिथींचे येथील थर्मल कॉलनी हेलिपॅडवर आगमन झाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे स्वागत पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केले. प्रशासनातर्फे विभागीय आयुक्त दिलीप गावडे आणि जिल्हाधिकारी अविनाश पाठक, पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी मुख्यमंत्र्यांचे स्वागत केले. यावेळी त्यांनी पोलीस दलातर्फे मानवंदना देण्यात आली.

तत्पूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे एकाच हेलिकॉप्टरने आगमन झाले. त्यांच्यासमवेत आमदार पंकजा मुंडे या देखील होत्या. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांचेही हेलिपॅडवर प्रशासनातर्फे स्वागत करण्यात आले.

## आमदार प्रकाश सोळंके यांच्या

माजलगाव मतदार संघात आशीर्वाद यात्रेचे आयोजन केले होते याच आशीर्वाद यात्रे दरम्यान दिंद्रुड येथील जनतेने आमदार सोळंके यांना एका प्रकरणाच्या बाबतीत छेडले असता पेपर वाले हे सर्व बातम्या खोट्या छापतात त्यामुळे मी पेपर वाचत नाही असे संताप जनक वक्तव्य केल्याने संतप्त पत्रकारांनी आज माजलगाव शहरात डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, ते छत्रपती संभाजी महाराज चौक अशी निषेध रॅली काढून आपला निषेध व्यक्त केला यावेळी अनेक पत्रकारांनी बोलताना सांगितले की प्रकाश सोळंके कोणते धुतलेल्या तांदळासारखे आहेत यांनी जमवलेली माया खोटे बोलूनच जमवलेली आहे असे असतानाही अखंड देशाच्या लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर बोलण्याचा यांना अधिकार नाही. प्रकाश सोळंके यांच्या अशा वक्तव्यामुळे अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला बीड जिल्ह्यातच नव्हे तर राज्यातील जनता धूळ चारून घरी बसवेल अशा संतप्त प्रतिक्रिया पत्रकारांनी या वेळी व्यक्त केल्या आहेत.या वेळी माजलगाव तालुक्यातील सर्व पत्रकार उपस्थित होते.

# बदलापूर घटनेचा धडा बीडच्या शिक्षण विभागाने घेवून उपाययोजना कराव्यात-मनोज जाधव



बीड (प्रतिनिधी) बदलापूरमधील नावाजलेल्या शाळेत शिकणाऱ्या दोन मुलींवर अत्याचार झाला. यातील एक चिमुकली चार वर्षांची, तर दुसरी सहा वर्षांची असल्याची माहिती मिळत आहे. शाळेत नुकत्याच सफाई कामगार म्हणून रूजू झालेल्या आरोपी नराधमानं चिमुकल्यांच्या अजाणतेपणाचा फायदा घेऊन त्यांच्यासोबत घृणास्पद कृत्य केले. अशी दुर्दैवी घटना आपल्या जिल्ह्यात घडूनये याकरिता शिक्षण विभाग आणि प्रशासनाने कठोर उपाय योजना करणे गरजेचे आहे. अशी मागणी शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केले आहे.

बदलापूर प्रकरणातील आरोपी कंत्राटी पद्धतीनं शाळेत कामावर रूजू झाला होता. मुलींच्या स्वच्छतागृहांची सफाई करणाऱ्या या आरोपीनं त्याच्या कामाचाच गैरफायदा घेतला. आणि या हैवानानं चिमुकल्यांचा अत्याचार केला. दरम्यान, शाळेनं मुलींच्या स्वच्छतागृहांच्या सफाईसाठी महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती का केली नाही? असा सवाल विचारला जात आहे. या दुर्दैवी घटनेची पुन्हा कधीही पुनरावृत्ती होऊ नये याकरिता शासन आणि प्रशासन आणि शिक्षण विभागाने पावले उचलणे गरजेचे आहे. याकरिता बीड जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये वर्ग खोल्या व शाळाच्या परिसरामध्ये सीसीटीवी बसवणे बंधनकारक करावे तसेच शाळेमध्ये शिकवणाऱ्या शिक्षक, शिक्षक उत्तर कर्मचारी, सेवक व इतर सर्व कर्मचाऱ्यांचे चारित्र्य पडताळणी करूनच त्यांना नोकरी द्यावी अशी मागणी ही मनोज जाधव यांनी केले आहे. याआधी बीडमध्ये एका नामांकित शाळेमध्ये असाच एक प्रकार घडला होता त्यातून शिक्षण विभागाने कसलाही धडा घेतला नाही आता तरी बदलापूर येथे घडलेल्या घटनेतून शिक्षण विभागाने धडा घ्यावा असेही पत्रकात म्हटले आहे.

# आपत्ती व्यवस्थापन जनजागृती रॅली/मिनी मॅरेथॉन स्पर्धे मध्ये तुलसीची पुनम बातरा द्वितीय



बीड(प्रतिनिधी):- जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जिल्हाधिकारी कार्यालय, बीड आपत्ती व्यवस्थापन शाखा यांच्या वतीने दि.१९ ऑगस्ट रोजी सकाळी ०७.०० वा अंबिका चौक बीड ते संत सेवालाल महाराज चौक रिलायंस पेट्रोल पंपा पर्यंत आपत्ती व्यवस्थापन जनजागृती रॅली आणि मिनी मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनचे प्राचार्य डॉ. अशोक धुलधुले यांनी विद्यार्थिनींना प्रोत्साहन दिले.

राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण महाराष्ट्र शासन यांनी आयोजित केलेल्या महा मॅरेथॉन २०२४- एक धाव सुरक्षेची या कार्यक्रमात तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन बीड येथील विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता. यामध्ये तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाइनिंग ची विद्यार्थिनी पूनम संतोष बात्रा हिने द्रितीय क्रमांक मिळविला आहे. तिला आयोजकांकडून प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच तुलसी फॅशन डिझाइनिंगच्या विद्यार्थिनी यांनाही सहभागाबद्दल प्रशस्तीपत्र देण्यात आले. यावेळी तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन बीड येथील सहाय्यक प्राध्यापिका सुप्रिया ससाने, श्वेता वंजारे, पूजा बिलपे उपस्थित यांची उपस्थिती होती.

# सूर्योदय च्या कार्यकारी संपादक पदी संतोष जोगदंड



प्रतिनिधी । बीड

येथील प्रसिद्ध दैनिक सूर्योदयाच्या कार्यकारी संपादक पदी ज्येष्ठ पत्रकार संतोष जोगदंड यांची निवड करण्यात आली आहे.मागील अनेक वर्षांपासून तै पत्रकारितैत कार्यरत आहेत संतोष जोगदंड यांनी दैनिक सामना दैनिक लोकाशा दैनिक भास्कर आदी दैनिकात विविध पदावर काम केले आहे त्यांना बीड जिल्ह्याच्या राजकीय सामाजिक व आर्थिक प्रश्नाची चांगली जाण आहे ते आता दैनिक सूर्योदय मध्ये कार्यकारी संपादक पदावर काम पाहतील त्यांच्या निवडीचे स्वागत संपादक गंगाधर काळकुटे संपादक दीपक काळकुटे व व्यवस्थापक वडमारे यांनी केले आहे



# वाहेगाव दलित वस्ती रस्त्यवर अतिक्रमण

गेवराई तालुक्यातील मौजे वाहेगाव येथील दलित वस्तीच्या (मातंग)मुख्य रस्ता जाणारा येणारा रहदारीचा वर्षानुवर्षी पासून ३० फुटाचा आहे परंतु सध्या त्या रस्त्यावर गावातील लोकांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले असून अतिक्रमण केल्यामुळे १०ते १२ फुट राहिला आहे त्यामुळे अतिक्रमण केल्यामुळे महिलांना व पुरुष बांधवांना रहदारीस मोठी अडचण निर्माण झाली आहे अशा ही परिस्थितीमध्ये ग्रामपंचायतने सध्या दलित वस्तीमध्ये रस्ता सिमेंट क्रौंक्रिंटचे काम चालू केले आहे त्यामुळे समाज बांधवांची मागणी आहे कि रस्त्याचे काम अतिक्रमण काढल्यावरच करावे तसेच सर्व दलित वस्तीच्या ग्रामस्थांची मागणी आहे कि तात्काळ मोठ्या प्रमाणात झालेले अतिक्रमण काढावे नसता वंचित बहुजन आघाडी गेवराई तालुक्याच्या वतीने व सर्व ग्रामस्थांच्या वतीने दिनांक २७/८/२०२४ सकाळी ११:०० वाजता जातेगाव फाटा नेशनल हायवे वर रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा आज रोजी गटविकास अधिकारी कांबळे मॅडम यांना दिलेल्या निवेदनात तालुका अध्यक्ष अजयकुमार पप्पू गायकवाड किशोर भोले पान २ वर

# शहरातील अशोक नगर बार्शी बीड येथील श्री हनुमान गणेश मंडळाची कार्यकारिणी जाहीर



बीड

सर्वांनी एक मताने, अध्यक्षपदी अशोक ढोले पाटील, तर उप अध्यक्षपदी विजय भांडवले यांची निवड करण्यात आली.यंदाच्या गणेशोत्सवासाठी श्री हानुमान गणेश मंडळाच्या कार्यकारिणीच्या निवडीसाठी बैठक कचरु गलधर,सुधीर भांडवले, बाबा ढोले,दिपक ढोले,संजय ढोले,सुभाष ढोले,शेख सुभान,अशोक कदम,गणेश गरुड,संजय मांहकुडे, बापू भांडवले,सुमित कोळपे,संजय लकडे,दिनेश कदम,संदिप गोरे,सचिन बोबडे, निवांत भांवडले.गौरव औटे ऋषीकेश ढोले सह आदी यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी पार पडली. उर्वरित कार्यकारिणीत ,सचिवपदी बाजीराव गलधर, सहसचिव पदी किरण कदम, कोषाध्यक्षपदी अमोल शिंदे, , प्रसिद्धीप्रमुखपदी, सिध्दांत भांडवले,प्रकाश तावरे,वैभव भांडवले, गणेश भांडवले,शुभम हाडुळे,महेश भांडवले, गौरव औटे, अक्षय कदम,ओमकार ढोले योगेश भांडले,रोहन ढोले यांची निवड करण्यात आली.व यावेळी उपस्थित भुषण सुरवसे लाला महांकुडे,नितिन सुरवसे, राकेश ढोले जयदिप ढोले निखील ढोले,अक्षय ढोले , विक्की ढोले,शिवदत ढोले,अभीषेक ढोले,गणेश गलधर, बंटी सुरवसे, अमोल भवरे,गितेश मोरे,मनोज वडमारे , अशोक बोबडे, नितिन फुंड,संजय जगताप, शैलेश आगलावे , ऋषीकेश कदम , ऋषीकेश घरात,अनिकेत, कदम,सचिन देवकर, अशोक कदम,सोनु घोडके,अजय घोडके,विजय घोडके, कृष्णा लकडे,सह परिसरातील नागरिक होते ,गेल्या ५८ अधिक वर्षांची परंपरा असलेल्या श्री हनुमान गणेश मंडळाच्या वतीने दरवर्षी आकर्षक विद्युत रोषणाई, देखावा केला जातो. सोबत विविध सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम राबवले जातात. या वर्षी श्री गणेश मुर्ती, भव्य दिव्य देखावा, आकर्षक विद्युत रोषणाई सोबतच विविध आरोग्यविषयक उपक्रम, रक्तदान शिबिर, बाल गट व शिशु गटासाठी नृत्य स्पर्धा , चित्रकला, रांगोळी, सायकल इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. बीड शहर वासियांनी या सांस्कृतिक, अध्यात्मिक उत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन श्री हनुमान गणेश मंडळ समितीतर्फे करण्यात आले



# शेकडो लाडक्या बहिणींनी राजेंद्र मस्केंना बांधली आशिर्वादाची राखी लाडकी बहीण योजनेने महिलांना मिळाला सक्षम आधार- राजेंद्र मस्के

बीड प्रतिनिधी

बहिण भावांच्या नात्यातील उत्कट जिव्हाळा व अतूट प्रेम जोपासुन बहिणींचा सन्मान करणारा राखी पौर्णिमा सणाला भारतीय संस्कृतीत अनन्य साधारण महत्त्व आहे. राज्य सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना जाहीर करून राज्यातील बहुतांश महिलांना सन्मानजनक सक्षम आधार दिला. आगामी काळात भगिनींचे आशीर्वाद वरदान ठरतील.

अशी अपेक्षा व्यक्त करून राजेंद्र मस्के यांनी भगिनींना राखी पौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.

मुख्यमंत्री लाडकी योजनेचा लाभ प्रत्येक पात्र भगिनी पर्यंत पोहोचवण्यासाठी भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या संकल्पनेतून

भाजपा कामगार मोर्चाच्या पुढाकाराने संघर्षयोद्धा जनसंपर्क कार्यलय येथे मोफत नाव नोंदणी अभियान राबवण्यात आले .

अभियानांतर्गत सुमारे २००० पेक्षा अधिक महिलांनी आपली नाव नोंदणी केली. यापैकी ७५ टक्के महिलांचे मानधन त्यांच्या खात्यात जमा झाले. महिलांच्या उत्स्फूर्त पुढाकारातून राजेंद्र मस्के यांच्या संघर्षयोद्धा जनसंपर्क

कार्यालयात रक्षा बंधनाचा गोड कार्यक्रम शेकडो महिलांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

महिलां भगिनींनी राजेंद्र मस्के यांचे औक्षण करून राखी बांधली. यावेळी प्रत्येक भगिनींना साडी सप्रेम भेट दिली .

या सांस्कृतिक कार्यक्रमास

माजी जिप उपाध्यक्ष जयश्रीताई मस्के,

लाडकी बहीण योजनेचे प्रदेश सहप्रभारी ओमप्रकाश गिरी...

कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव तथा मराठावाडा अध्यक्ष दादासाहेब ननावरे, कामगार मोर्चा मराठावाडा उपाध्यक्ष लालासाहेब पन्हाळे, मारुती तिपाले,लताताई मस्के,मनिषाताई स्वामी, नेहा माळी, गीताताई काळे, मनीषाताई मुंडे,

वैशाली नन्नवरे, गीतांजली ननवरे, कविताताई गिरी, अंजलीताई गिरी,

बाळासाहेब सोलनकर

गणेश तोडेकर, सुरेश माने, राकेश बिराजदार,

अजय ढाकणे, अविनाश नवले,आदी सह महिला बहुसंख्येने उपस्थित होत्या.

# चिंचाळ्यात मंदिराची दानपेटी फोडणारा चोरटा रंगेहाथ पकडला



आष्टी, दि. १९ : तालुक्यातील चिंचाळा परिसरातील एका मंदिराचे कुलूप तोडून दानपेटी फोडण्याचा प्रयत्न करणाऱ्या गणेश दत्तू कांबळे (रा. देसूर ता. आष्टी) या चोरट्यास ग्रामस्थांनी रंगेहाथ पकडले. काल (ता. १७) रात्री अकराच्या सुमारास हा प्रकार घडला.

याबाबत दिलीप बाळू पोकळे (वय ३४ वर्षे, व्यवसाय शेती रा. चिंचाळा ता. आष्टी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चिंचाळा-देसूर रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम सुरू असून, या भागातील खटकळी परिसरात बाबासाहेब देवस्थान परिसरात डांबरीकरणाचे काम करण्यात येत आहे. आहे. बाबासाहेब देवस्थान मंदिरामध्ये काहीतरी ठोकल्याचा मोठ्याने आवाज येत आहे. असे रस्त्याचे काम करणारे अनिल सतीश पोकळे यांनी फिर्यादीला ता. १६ रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास फोन करून सांगितले.

त्यानुसार फिर्यादी हे आपले सहकारी शरद पोथीराम पोकळे, जानदेव नवनाथ साळुंके, सुरेश एकनाथ पोकळे, कंकालेश्वर विठ्ठल पोकळे, ईश्वर शहाजी पोकळे यांना घेऊन बाबासाहेब देवस्थान मंदिर खटकळी येथे गेले असता तेथे गणेश दत्तू कांबळे हा विठ्ठल-रुक्मिणी मंदिराची दानपेटी गजाच्या सहाय्याने फोडत असताना मिळून आला. त्याने मंदिराचे लोखंडी गेटचे कुलूप तोडल्याचे व वामनभाऊ मंदिराचेही कुलूप तोडून आत प्रवेश केल्याचे दिसून आले. याबाबत आष्टी पोलीस ठाण्यात गणेश कांबळे याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(चौकट)

दोन-तीन वेळा घडले चोरीचे प्रकार

दरम्यान, चिंचाळा येथे बाबासाहेब देवस्थानमध्ये महादेव मंदीर असून यामध्ये विठ्ठल-रुक्मिनी मंदीर, श्रीसंत वामनभाऊ, श्रीसंत यादवबाबा यांच्या मूर्ती आहेत. काही दिवसांपूर्वी भाविकांनी अर्पण केलेल्या घंटा, पितळाच्या समया, अर्पण करण्यात आलेले नवसाचे चांदीचे घोडे असा ऐवजाची चोरी झाली आहे. तसेच एका वेळेस दानपेटी फोडून त्यातील रक्कम लंपास करण्यात आली आहे. या सर्व प्रकरणांचा उलगडा पोलिस तपासात करण्यात यावा, अशी मागणी परिसरातील भाविकांमधून होत आहे.

# बदलापूर येथील आरोपीला भर चौकात गोळ्या घाला:- राजेंद्र आमटे

## अजून किती निष्पाप आयुष्य उद्ध्वस्त होऊ देणार?



बीड (प्रतिनिधी) वासनेच्या अधीन झालेल्या नराधमाने एक नव्हे अनेक लेकीच आयुष्य उद्ध्वस्त केले आहे. एखाद्या निष्पाप मुलीचा बलात्कार, खून, हत्या झाली की आम्ही मेणबत्या पेटवतो, मोर्चे काढतो, बंद हाक देतो पुन्हा दोन चार महिने झाले की शांत होतो आरोपी जमीन करून घेतात पुन्हा रजोस मोकळे फिरतात बलात्कार, खून, यातील आरोपीचे खटले प्रकरण चालवण्यात वेळ न घालवता हाय स्पीड खटले चालवत प्रकरण निकाली काढून तत्काळ आरोपीला भर चौकात गोळ्या घाला. काय होईच ते होऊ ध्या पुन्हा एखाद्या निष्पाप लेकी कडे वाकडी नजर करून पाहण्याची हिम्मत कोणता होणार नाही.

ज्या देशात स्त्री च्या सन्मान साठी रामायणाचे युद्ध महाभारताचे युद्ध झाले त्याच देशात बलात्कार, खून अत्याचार करणाऱ्या नराधमाच्या विरोधात मेणबत्या पेटवतो, कोठे बंद करतो या पेक्षा भर चौकात उभा करून गोळ्या घालाव्यात तेव्हा या देशातील लेकी सुरक्षित राहतील आधी कोलकत्ता व नंतर बदलापूर येथील प्रकार अतिशय दुर्दैवी आहे कायद्याच्या नेबळट पणा मुळे झाला आहे बदलापूर येथील आरोपींना भर चौकात गोळ्या घालाव्यात अशी मागणी शिवसंग्राम शेतकरी आघाडी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, अर्जुन सोनवणे, संजय तीपाले, सुधाकर सोनवणे, कृष्णा मसुरे, रमेश जगताप, शैलेश सुरवसे, आदीच्या वतीने आव्हान करण्यात येते आहे

# प्रभाकर कोलंगडे यांची शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्षपदी निवड



## डॉ.ज्योती मेटे यांच्याकडून प्रभाकर कोलंगडे यांच्यावर मोठी जबाबदारी प्रभाकर कोलंगडे यांच्यावर शिवसंग्रामच्या प्रदेश उपाध्यक्ष पदाची जबाबदारी

बीड (प्रतिनिधी) शिवसंग्रामच्या पुणे येथील राज्य कार्यकारिणी बैठकीत शिवसंग्राम चे ज्येष्ठ नेते प्रभाकर कोलंगडे यांच्यावर शिवसंग्रामच्या अध्यक्षा डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी महत्त्वपूर्ण जबाबदारी दिली असून त्यांची शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. या निवडीने शिवसंग्रामच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंद व्यक्त होत आहे.

पुणे येथे झालेल्या शिवसंग्रामच्या राज्य कार्यकारिणी बैठकीत डॉ. ज्योती मेटे यांची अध्यक्ष म्हणून एकमताने फेर निवड करण्यात आली तर इतर निवडीचे सर्वाधिकार बैठकीत डॉ. मेटे यांना देण्यात आले. यावेळी त्यांनी आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसंग्राम मध्ये खांदेपालट करत प्रदेश पातळीवरच्या विविध निवडी केल्या आणि विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजवले यात बीड जिल्ह्यातील शिवसंग्राम चे ज्येष्ठ नेते प्रभाकर कोलंगडे यांना राज्य पातळीवर शिवसंग्रामच्या प्रदेश उपाध्यक्ष पदाची जबाबदारी दिली. दिवंगत विनायकराव मेटे यांच्या सोबत अत्यंत हिरीरीने शिवसंग्राम वाढवण्यासाठी त्यांनी काम केले याआधी स्वर्गीय विनायकराव मेटे यांनी त्यांच्यावर अनेक जबाबदाऱ्या दिल्या त्या त्यांनी योग्यरीत्या पार पाडल्या आणि म्हणूनच ज्येष्ठत्वाचा आणि चाळीस वर्षाचा राजकीय अनुभवाचा फायदा हा येणारा काळात नक्कीच होईल या हेतूने त्यांची ही निवड करण्यात आली आहे.

cmyk



# मनोज जरांगे पाटील यांनी बीड विधानसभा मतदारसंघात मुस्लिम समाजातील उमेदवाराला संधी देण्यात यावी-शेख निजाम



**बीड । प्रतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्राच्या राजकारणाचे केंद्रबिंदू असलेले मराठा योद्धा मा. मनोज दादा जरांगे पाटील यांची शेख निजाम यांनी दिनांक २० ऑगस्ट २०२४ रोजी भेट घेतली व सदरील भेटीमध्ये विविध सामाजिक व राजकीय विषयावर चर्चा झाली त्यामध्ये प्रामुख्याने बीड जिल्ह्यातील बीड विधानसभा मतदारसंघ हा अत्यंत महत्त्वाचा मतदारसंघ मानला जातो बीड जिल्ह्यातील राजकारणामध्ये बीड विधानसभा मतदारसंघाचा प्रभाव फार मोठा आहे बीड विधानसभेच्या एकूण परिस्थितीनुसारच बीड जिल्ह्यातील इतर मतदार संघाचे निकाल अवलंबून असतात असा इतिहास आहे बीड विधानसभा क्षेत्रामध्ये मुस्लिम अल्पसंख्याक समाजाची निर्णायक मते असून मुस्लिम समाज ज्या व्यक्ती पक्ष किंवा उमेदवाराच्या मागे उभा राहिला त्याचा विजय निश्चित मानला जातो याची प्रचिती मागील झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये माननीय खासदार बजरंग बाप्पा सोनवणे यांच्या विजया नमित्त आलेली दिसते मराठा आरक्षणाच्या संदर्भात मराठा योद्धा माननीय मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या आरक्षणाच्या लढ्यामध्ये मुस्लिम समाजाने लहान भावाची भूमिका बजावून मराठा समाजाच्या खांद्याला खांदा लावून मराठा समाजास आरक्षण मिळावे अशी भूमिका घेतली व मनोज जरांगे पाटील व त्यांच्या आंदोलनाला पूर्णपणे समर्थन व पाठिंबा दिलेला आहे त्यामुळे बीड विधानसभा मतदारसंघातील मुस्लिम मते निर्णायक असल्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये बीड विधानसभा मतदारसंघात मुस्लिम समाजाच्या उमेदवारास संधी द्यावी किंवा तशी शिफारस करावी असे शेख निजाम यांनी मनोज जरांगे पाटील यांच्याकडे मागणी केलेली आहे.

## बालरंगभूमी परिषद मुंबईच्या जल्लोष लोककलाचा कार्यक्रमात निवेदक सुरेश साळुंकेंचा

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्राची कला व परंपरा जपताना बालमनावर संस्कार करत कलासक्त आणि सशक्त नागरिक घडवण्याच्या दृष्टिने बालरंगभूमी परिषद विविध रचनात्मक उपक्रम राबवते. त्या अनुषंगाने बालरंगभूमी परिषदे शाखा बीडने बालरंगभूमी राज्य उपाध्यक्ष तथा अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या कार्यकारी मंडळ सदस्या डॉ.दीपाताई क्षीरसागरांच्या मार्गदर्शनाखाली सुप्रसिद्ध अभिनेत्री तथा बालरंगभूमी परिषद मुंबईच्या महाराष्ट्र राज्याध्यक्षा सौ.निलमताई शिर्के-सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये जल्लोष लोककलेचा...चला उधळुया लोकरंग कार्यक्रमाचे आयोजन केले होते.नृत्य वादन गायन या कलेच्या अनुषंगाने आयोजित केलेल्या जल्लोष लोककलेच्या कार्यक्रमात लोककलेतील वाद्यांची,गीतांची,वेशभूषेची,भाषेची,यात्रा-जत्रा,रुढी परंपराची प्रभावी माहिती सांगत निवेदन केल्याबद्दल होम मिनिस्टर स्मार्ट मिनिस्टरचे निर्माते निवेदक सुरेश साळुंकेंचा डॉ. दीपाताई क्षीरसागर, सुरश्री भरतअण्णा लोळगे, डॉ संजय पाटील देवळाणकर आणि श्रीमती स्नेहलताईच्या उपस्थितीमध्ये अभिनेत्री निलमताई शिर्के-सामंत यांच्या शुभहस्ते बालकलावंतांच्या टाळ्यांच्या गजरात सत्कार करण्यात आला. सुप्रसिद्ध निवेदक सुरेश साळुंके यांनी





निवेदन क्षेत्रामध्ये स्वतःची एक उंची वाढवून स्वतःची ओळख निर्माण केली आहे.दरम्यानच्या काळात त्यांनी तयार केलेला होम मिनिस्टर स्मार्ट मिनिस्टर हा कार्यक्रम देखील विवाह-हाळदी,वाढदिवस,बारसे, मँरेज निवरसरी, या कौटुंबिक सोहळ्यामध्ये प्रसिद्ध होत आहे अशा या सर्वांग सुंदर निवेदन करणाऱ्या सुरेश साळुंकेचे सांस्कृतिक,धार्मिक,अध्यात्मिक क्षेत्रांमध्ये कौतुक होत आहे. नीलम ताई शिर्के यांच्या हस्ते सत्कार झाल्याबद्दल डॉ.अनिता शिंदे, शाहिर विलास सोनवणे, संस्कृत भाषेचे गाढे अभ्यासक प्रेरक वैद्य, ढोलकी सम्राट नितिन प्रधान, रामटेके, अमित गाढे, छायाचित्रकार निलेश यलगीरे, विजयकुमार राख, पवन शिंदेसह अनेक मान्यवर कलावंतानी अभिनंदन केले आहे.



## साकत येथे कृषी अधिकाऱ्यांनाकडून पिकांच्या नुकसानीची पाहणी

**जामखेड । प्रतिनिधी**

जामखेड तालुक्यातील साकत परिसरात जोरदार पावसाने झालेल्या नुकसानीचे अद्यपी पंचनामे न झाल्याने शेतकरी संतप्त झाले आहे. शेतकऱ्यांना सरकारकडून आर्थिक मदतीची प्रतिक्षा आहे. साकत परिसरात अतिवृष्टी झाल्यावर अधिकाऱ्यांनी नुकसानीची पाहणी केली, पण नुकसानीचे पंचनामे अद्याप केले नाहीत. सोयाबीन, कांदा, इतर पिकांचे नुकसान झाले असून सर्वच पिकांचे पंचनामे करावेत, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. दरम्यान, शनिवारी व रविवारी अतिवृष्टी झाल्यानंतर काल (सोमवारी) तालुका कृषी अधिकारी रविंद्र घुले यांनी साकत परिसरातील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी करीत शेतकऱ्यांशी चर्चा केली.बाधित क्षेत्राचे पंचनामे लवकरच करण्यात येईल.असे त्यांनी सांगितले.यावेळी माजी सभापती डॉ भगवान मुरूमकर, माजी सरपंच सदाशिव वराट, कृषी पर्यवेक्षक रावसाहेब डमरे, सुरेश कटके, कृषी सहायक समाधान सोनवणे, चंद्रशेखर गाडेकर,राणी चव्हाण, विठ्ठल वराट, रामहरी वराट, बिभिषण वराट, दिलीप मुरूमकर आदी शेतकरी उपस्थित होते.

## वाढदिवसानिमित्त जि.प.पंचायत समिती शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप



**आष्टी । प्रतिनिधी**

सामाजिक बांधिलकी जपत सहकार प्रतिष्ठानया सामाजिक संस्थेच्या वतीने युवा उदोजक महेश शेठ हंबर्डे,युवा नेते नानासाहेब ढोरमारे मा सरपंच व महावितरण चे शिवाजीराव मार्कंडे साहेब यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आवश्यक खर्चाला फाटा देत जिल्हा परिषद पंचायत समिती येथीलशाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले हे प्रतिष्ठान नेहमीच सामाजिक धार्मिक कार्यामध्ये अग्रेसर असते उन्हाळ्यामध्ये जनावरांसाठी पानवटे पक्ष्यांसाठी पक्षी थांबे त्याच्यामध्ये खाद्य असे अनेक चांगले उपक्रम हे सहकार प्रतिष्ठान राबवत असते यामुळे या प्रतिष्ठानचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे या वेळी युवा उदोजक माश्री महेश शेठ हंबर्डे युवा नेते नानासाहेब ढोरमारे व महावितरण चे शिवाजीराव मार्कंडे या च बरोबर इजिनियर चंद्रकांत धस ,समिर पोकळे शरद कदम वकील, प्रशांत द्वारके, माऊली गोरे, गणेश पोकळे, वैजिनाथ डहाळे, मयुर आधापुरे, विशाल शेट्टी, निलेश सोनवणे, स्वप्निल नखाते, सचिन भौगाडे, साबेर बेग, शहर व सर्व सहकार प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेचे संचालक होते.

## फ्रेंडस् स्पोर्ट कडमी आयोजीत क्रिकेट स्पर्धेत आदर्श क्रिकेट संघ सलग तिन सामने जिंकून

**बीड। प्रतिनिधी**

१४ वर्षाखालील गटाच्या शासनमान्य नोंदणीकृत फ्रेंडस् स्पोर्ट कडमी आयोजीत क्रिकेट स्पर्धेत आज आदर्श क्रिकेट संघ बीड विरूध्द रोहन क्रिकेट संघ लातुर यांच्यात डीएसके मैदान सिदोड येथे सामना खेळण्यात आला यावेळी संजय धस यांच्या हास्ते नाणेफेक करण्यात आले रोहन संघाने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला यावेळी फलंदाजीसाठी आलेल्या आदर्श संघाची सुरवात चांगली झाली नाही आदर्श संघाचा तडाखेबाज फंलदाज शौर्य जाधव हा केवळ ४ धांवावर आसतांना झेलबाद झाला तसेच राजन कवटेकर हा १९ धावा करून १०व्या षटकांत बाद झाला त्यांनतर आलेल्या पृथ्वी पाळणे व श्रवण गालफाडे यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला परंतु पृथ्वी स्वताच्या १५ धावावर आसतांना बाद झाला मात्र श्रवण यांने संघाची



(रूद्राक्ष जाधव- ७ षटक २ धावा ३ गडी बाद)



(कृष्णा गायकवाड - ७ षटक २ धाव ४ गडी बाद )

एकबाजू लावून धरत नाबाद ९४ धावा करत संघाची धावसंख्या ३५ षटकांत ८ बाद १६८ पर्यंत पोहचवली या धावाचा पाठलाग करतांना रोहन क्रिकेट लातूर संघ १०० धावांवर सर्व संघ बाद झाला आदर्श क्रिकेट संघाकडून गोलंदाजी करतांना कृष्णा गायकवाड यांने ७ षटकांत २ धावा देत ४ गडी बाद केले, तर रूद्राक्ष जाधव यांने ७ षटकांत केवळ २ धावा देत ३ गडीबाद केले, आदर्श क्रिकेट संघाने रोहन संधावर विजय मिळवत ३ सामन्यापैकी तिन्ही सामने जिंकून उपात्यं फेरीत मजल मारली हा सामना पाहण्यासाठी बीड मधील क्रिकेटप्रेमी सिदोड येथील डीएसके मैदानांवर उपस्थित होते सामनावीर चे पारितोषिक बीड जिल्हाक्रिकेट असोशियनचे सदस्य जावेद पाशा, रिजवान भाई, नासेर मोमीन यांच्या हस्ते कृष्णा गायकवाड व रूद्राक्ष जाधव ला देण्यात आला यावेळी स्पर्धा आयोजक फ्रेंडस् स्पोर्ट काडमीचे अध्यक्ष तथा मनविसे राज्यउपाध्यक्ष ड्. शैलेश जाधव,बाबासाहेब गोरे, संतोष कवटेकर, आरूण गलांडे, संजय कुलकर्णी, आदर्श क्रिकेट संघाचे प्रशिक्षक अजहर शेख यांच्या सह क्रिकेट प्रेमी हजर होते.

## चिंचाळ्यात मंदिराची दानपेटी फोडणारा चोरटा रंगेहाथ पकडला



**आष्टी। प्रतिनिधी**

**तालुक्यातील चिंचाळा परिसरातील एका मंदिराचे कुलूप तोडून दानपेटी फोडण्याचा प्रयत्न करणा-या गणेश दत्तू कांबळे (रा. देसूर ता. आष्टी) या चोरट्यास ग्रामस्थांनी रंगेहाथ पकडले. काल (ता. १७) रात्री अकराच्या सुमारास हा प्रकार घडला. याबाबत दिलीप बाळू पोकळे (वय ३४ वर्षे, व्यवसाय शेती रा. चिंचाळा ता. आष्टी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

चिंचाळा-देसूर रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम सुरू असून, या भागातील खटकळी परिसरात बाबासाहेब देवस्थान परिसरात डांबरीकरणाचे काम करण्यात येत आहे. आहे. बाबासाहेब देवस्थान मंदिरामध्ये काहीतरी ठोकल्याचा मोठ्याने आवाज येत आहे. असे रस्त्याचे काम करणारे अनिल सतीश पोकळे यांनी फिर्यादीला ता. १६ रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास फोन करून सांगितले. त्यानुसार फिर्यादी हे आपले सहकारी शरद पोथीराम पोकळे, जानदेव नवनाथ साळुंके, सुरेश एकनाथ पोकळे, कंकालेश्वर विठ्ठल पोकळे, ईश्वर शहाजी पोकळे यांना घेऊन बाबासाहेब देवस्थान मंदिर खटकळी येथे गेले असता तेथे गणेश दत्तू कांबळे हा विठ्ठल-रुक्मिणी मंदिराची दानपेटी गजाच्या सहाय्याने फोडत असताना मिळून आला. त्याने मंदिराचे लोखंडी गेटचे कुलूप तोडल्याचे व वामनभाऊ मंदिराचेही कुलूप तोडून आत प्रवेश केल्याचे दिसून आले. याबाबत आष्टी पोलीस ठाण्यात गणेश कांबळे याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### दोन-तीन वेळा घडले चोरीचे प्रकार

दरम्यान, चिंचाळा येथे बाबासाहेब देवस्थानमध्ये महादेव मंदीर असून यामध्ये विठ्ठल-रुख्मिनी मंदीर, श्रीसंत वामनभाऊ, श्रीसंत यादवबाबा यांच्या मूर्ती आहेत. काही दिवसांपूर्वी भाविकांनी अर्पण केलेल्या घंटा, पितळाच्या समया, अर्पण करण्यात आलेले नवसाचे चांदीचे घोडे असा ऐवजाची चोरी झाली आहे. तसेच एका वेळेस दानपेटी फोडून त्यातील रक्कम लंपास करण्यात आली आहे. या सर्व प्रकरणांचा उलगडा पोलिस तपासात करण्यात यावा, अशी मागणी परिसरातील भाविकांमधून होत आहे.



## सनराईज इंग्लिश स्कूल येथे रक्षाबंधन साजरा

**जामखेड । प्रतिनिधी**

जामखेड तालुक्यातील पाडळी येथील सनराईज इंग्लिश स्कूल मध्ये मंगळवार दि. २० ऑगस्ट २०२४ रोजी बहीण भावाच्या नात्याचे अतूट बंधन म्हणजे रक्षाबंधन' हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी लाडक्या बहिणींनी भावांना राख्या बांधून पेढा भरविला तर लाडक्या बहिणीसाठी भावांनी शालेय साहित्य वाटप केले. डॉ. विशाल बोराटे यांच्या वतीने रक्षाबंधनाच्या या कार्यक्रमासाठी सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप करण्यात आले.यावेळी संस्थेचे संचालक तेजस भोरे यांनी डॉ. विशाल बोराटे यांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे नियोजन स्कूल चे प्रिंसिपल अमर भैसडे यांनी केले होते. यावेळी सहशिक्षक बिभीषण भोरे, सागर कदम, सुरज वाघमारे, जयश्री कदम, जयश्री सापते, हर्षा पवार, सानिया सय्यद, दीपक दहिकर आदी विद्यार्थी उपस्थित होते.

# जामखेड पोलीसांची मोठी कारवाई

## १० लाख ३५ हजार रु किंमतीच्या ३६ मोटारसायकली हस्तगत

**जामखेड । प्रतिनिधी**

**फायनान्स कंपनीत काम करत असल्याचे सांगून आमच्या कडील मोटारसायकली कंपनीने ओढून आणलेल्या आहेत त्यातुम्हाला स्वस्त किंमतीत देतो, असे सांगून नातेवाईक व ओळखीच्या लोकांना चोरीच्या विविध कंपनीच्या मोटारसायकली विकल्या होत्या. याच अनुषंगाने जामखेड पोलीसांनी या चोरीस गेलेल्या १० लाख ३५ हजार रुपये किंमतीच्या ३६ मोटारसायकलीसह दोन सराईत चोरट्यांना पकडुन त्यांच्या कडुन हस्तगत केल्या आहेत.**

या प्रकरणी ३६ मोटारसायकल चोरणाऱ्या आरोपी वैभव बाबासाहेब खेडकर, वय ३५ व सुधीर शहाजी सुरवसे, वय ३२ दोघे रा. माहीजळगाव ता. कर्जत





यादोघांना जामखेड पोलीसांनी अटक केली आहे. याबाबत नुकतेच कर्जत जामखेड चे उपविभागीय पोलीस अधिकारी विवेकानंद वाखारे व जामखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी पत्रकारांना माहिती दिली. यावेळी पत्रकारांशी बोलताना उपविभागीय अधिकारी वाखारे यांनी सांगितले की, दि. १६ ऑगस्ट रोजी सायंकाळी आठ वाजण्याच्या सुमारास जामखेड पोलीस स्टेशनचे पोलीस कॉ. कुलदीप घोळवे, पो. कॉ. भागीरथ देशमाने हे बस स्थानक परिसरात पेट्रोलिंग करत असताना आरोपी वैभव बाबासाहेब खेडकर रा. माहिजळगाव, ता. कर्जत. जि. अहमदनगर हा संशयतरित्या बिगर नंबर प्लेट मोटारसायकलवर फिरत होता. यावेळी त्याच्याकडे मोटारसायकल बाबत कागदपत्रांची चौकशी केली असता त्याला समाधान कारक उत्तर देता आले नाही. यावेळी पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन जामखेड पोलीस स्टेशनला आणले व मोटारसायकल बाबत चौकशी केली असता त्याने सांगितले की मी व माझा मित्र सुजित शहाजी सुरवसे रा .माहीजळगाव सदर मोटारसायकल चोरीत सहभागी असल्याचे सांगितले. याबाबत जामखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी असे आवाहन केले आहे की, ज्यांची मोटारसायकल चोरीस गेलेली आहे त्यांनी जामखेड पोलीस स्टेशनला संपर्क करावा. सदरची कारवाई ही राकेश ओला पोलीस अधिक्षक अहमदनगर, प्रशांत खैरे, अपर पोलीस अधिक्षक अहमदनगर, विवेकानंद वाखारे, उपविभागीय पोलीस अधिकारी कर्जत विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक महेश पाटील, सहायक पोलिस निरीक्षक वर्षा जाधव, जामखेड शहर बीटाचे अंमलदार पोहेकॉ/प्रविण इंगळे, पो.ना. संतोष कोपनर, पो. ना. जितेंद्र सरोदे, पो. कॉ. प्रकाश मांडगे, पो.कॉ..कुलदिप घोळवे, पो.कॉ. देविदास पळसे, पो.कॉ. ज्ञानेश्वर बेल्हेकर, पो. कॉ. भगिरथ देशमाने, पो.कॉ. जिब्राईल शेख व सायबर सेलचे पो.कॉ. नितीन शिंदे व पो.कॉ. राहुल गुंडु यांच्या पथकाने केली आहे.

# लिंबागणेश महसूल मंडळात अतिवृष्टीमुळे नुकसान ; पंचनामे करून नुकसान भरपाईची मागणी

## महसूल प्रशासन म्हणते वरून पंचनाम्याचे आदेश नाही तर कृषी विभाग कृषी महोत्सवात व्यस्त

**बीड । प्रतिनिधी**

**बीड तालुक्यातील सात महसुली मंडळात अतिवृष्टी झाली असुन लिंबागणेश महसूल मंडळात ९५.३ मि.मि.पाऊस झाल्याची शासन दरबारी नोंद झाली आहे. बीड तालुक्यात १ जुन पासुन समाधानकारक पाऊस असतानाच दोन दिवसांपूर्वी झालेल्या पावसाने शेतातील मका , सोयाबीन आदी पिके पाण्याखाली गेली आहेत तर काही ठिकाणी भुईसपाट झाली आहेत. अस्मानी संकटामुळे हातातोंडाशी आलेला घास हिरावला असुन शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यामुळे महसूल प्रशासनाने तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी महसूल प्रशासन व कृषीविभागाला केली आहे.**

मका पिकांवर उगवल्यापासुनच लष्करी अळीने हल्ला चढवला होता, थेट मक्याच्या भुट्यांमध्येही अळीने पन्नास टक्के दाणे खाऊन टाकले होते मोठ्या प्रमाणावर औषध पाण्याचा खर्च करून जे शेतात तग धरून होते. २ दिवसांच्या पावसाने आडवे होऊन भुईसपाट झाले आहे.शेतात मक्याचे कणसं मातीत लोळत असुन हातातोंडाशी आलेला घास अतिवृष्टीमुळे हिरावला असुन सरकारने पंचनामे करून आम्हाला मदत करावी अशी मागणी लिंबागणेश



येथील नुकसान ग्रस्त शेतकरी आनिल ढवळे, जनार्दन वाणी,विनायक मोरे यांनी केली आहे. मका पिकांमध्ये गुडघाभर पाणी साचले असुन मुळाशी पाणी लागल्याने पिक वायाच जाणार आहे. मी अडाणी माझ्याकडे साधा मोबाईल आहे आणि ई पिक पाहणी म्हणतेत ते काही आम्हाला जमत नाही अशी व्यथा आनिल ढवळे यांनी बोलाऊन दाखवली. लिंबागणेश महसूल मंडळातील अतिवृष्टीमुळे नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यात यावी यासाठी महसूल प्रशासनाला संपर्क साधला असता तलाठी पोतदार यांनी आम्हाला अजुन पंचनामे करण्याचे वरून आदेश आले नाहीत म्हटले तर मंडळ अधिकारी अशोक डरपे यांनी स्थानिक पातळीवरील तलाठी, ग्रामसेवक,कृषी सहाय्यक यांची गावपातळीवरील कमिटी पंचनामे करेल असे सांगितले तर कृषी विभागातील अधिकारी ,कर्मचारी आजपासून ५ दिवस परळी येथे राज्यस्तरीय कृषी महोत्सवात व्यस्त असल्याचे सांगितले त्यामुळे महसूल आणि कृषी विभागाच्या संयुक्त पथकाने करण्यात येणाऱ्या नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे कधी होणार आणि मदत कधी मिळणार हा सुद्धा एक प्रश्नच आहे.

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर,एम.एस.ई.बी.ऑफीसजवळ, माळीवेस बीड-४३१ १२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड,जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड,बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर , नगर रोड,बीड ४३११२२ संपादकः गंगाधर काळकुटे मो.९४२१२८२०२८, अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.(वाद बीड न्यायकक्षेत)

cmyk